Aarhat Publication & Aarhat Journal's

# AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Multidisciplinary Research Journal

ISSN- 2278-5655

Online and Print Journal

EduIndex Impact Factor: 5.18

UGC Approved Journal No 48178, 48818

Vol VII Special Issues No II

Chief Editor

Ubale Amol .B.

# INDEX



| Sr. No. | Author Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Anamica Dubey | Prospects Of Position Of Women In Early India With Special Referece To Vedic Period | 01 to 04 |
| 2. | डॉ.धाकड योगिनी पद्माकर | वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयामधून विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा :एक अभ्यास | 05 to 14 |
| 3. | S. Natarajan And Dr. R. Rajan Babu | Customers' Perception About E-Banking Services – A Study With Reference To Mayiladuthurai Town | 15 to 19 |
| 4. | Kuldeep | Does The Rights Of Persons With Disabilities Act, 2016 Execute The Needs Of Person With Autism Spectrum Disorder And Educationist ? | 20 to 26 |
| 5. | Bindia Rani | Dr. B. R. Ambedkar's Thoughts And Contribution Towards Women Empowerment | 27 to 33 |
| 6. | Pravin V. Matey And Dr. Prakash H. Karmadkar | Service Quality Gap Analysis of Premium Brand Commercial Vehicle Company | 34 to 39 |
| 7 | Mr. Sanjay Nangare And Miss. Najnin Maner And Dr. Rajesh Birajdar | Socio-Economic Assessment of Kusavali Village in Maval Tahsil of Pune District in Maharashtra, India | 40 to 46 |
| 8. | Dr. Lohote P. K. | The Effect of psychology interventiontraining proramme on Competitive anxiety, and their performance of shot-put athletes. | 47 to 51 |
| 9. | Dr. Pankaj Ganpat Kolhe | The Cross Cultural in Manohar Malgaonkars' Novel "The Princess" | 52 to 54 |
| 10. | Mr. Dattatray P. Mane And Dr. Arun D. Andhale | Rainwater Harvesting Potential for Industrial Units in Pimpari Chinchwad M MIDC, Maharashtra, India | 55 to 66 |
| 11. | Dr. Bharati Yadav | The Emerging Issues of Indian Economy | 67 to 70 |
| 12. | Mr. Sandip Shinde | Agriculture and its Effects on Rural Economical Development of Kusavli Village, in Mawal Tahsil in Pune District (Maharashtra) | 71 to 74 |
| 13. | Dr. Rajesh Birajdar And Dr. Sanjay Jagtap | Population Structure of Kusavali Village, in Mawal Tahsil in Pune District of Maharashtra, India | 75 to 80 |
| 14. | Dr. Sonawane Jagdish Chhaburao | Akbar's Policy of Religious Tolerance | 81 to 83 |
| 15. | Savita M. Raut And Dr. Sharwari S. Kulkarni | Analysis Of Recovery And Overdue Position Of Pacs In Western Region In India | 84 to 89 |
| 16. | Dr Jyoti Baijal | Correlates Of Examination Stress | 90 to 95 |
| 17. | डॉ.विजया विनायक पाटील | बालशिक्षण :भारतीय संशोधने आढावा | 96 to 105 |

# बालशिक्षण : भारतीय संशोधने आढावा

**डॉ. विजया विनायक पाटील**
*सहा. प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,*
*य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक*

## ०.१. प्रास्ताविक :-

शैक्षणिक संशोधन हे प्रामुख्याने अभ्यासक्रम, अध्ययन – अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन विद्यार्थी, शिक्षक, त्यांचे प्राविण्य व प्रभावीपणा शिक्षणावर प्रभाव टाकणारे घटक इ. क्षेत्रांशी निगडित असते. शैक्षणिक धोरणे शक्यतो संशोधनावर आधारित असावीत असे मानले जाते. म्हणून १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ह्या संशोधनावरील आग्रह स्पष्ट होतो.

शिक्षण क्षेत्रातील संशोधनाचे सर्वेक्षणानंतर गोषवारे प्रसिद्ध करण्यात येतात. आतापर्यंत अशी पाच सर्वेक्षणे झालेली असून सात खंडामध्ये हे गोषवारे उपलब्ध आहेत. ह्या सात खंडामध्ये मिळून शिक्षणावरील जवळजवळ ६,४२५ संशोधनांचे गोषवारे प्रसिद्ध झालेले आहेत. त्यापैकी फक्त १४४ संशोधने ही बालशिक्षणावरची आहेत. याचाच आर्थ फक्त २.२४% संशोधने ही बालशिक्षणाबाबत झालेली आहेत. बालशिक्षणावरील सर्वात प्रथम संशोधन १९५७ साली करण्यात आले. बालशिक्षणाच्या क्षेत्राबरोबरच त्याचे संशोधनक्षेत्र ही दुर्लक्षित झालेले दिसते. एवढया तुटपुंज्या संशोधनावरून बालशिक्षणातील समस्या, त्यावरील उपाय, विविध प्रयोग, इ. विषयी माहिती, निष्कर्ष बालशिक्षणातील कार्य करणाऱ्या व्यक्तींपर्यंत कसे पोहोचणार? बालशिक्षणावरील संशोधनाच्या व्यापक क्षेत्राची कल्पना कोण करू शकेल? त्यासाठी प्रेरणा कशी मिळणार? असे विविध प्रश्न पर्यायाने उपस्थित होतात.

बालशिक्षणातील भारतीय संशोधनाची नेमकी काय स्थिती काय आहे? त्यातून हाती आलेल्या निष्कर्षांच्या आधारे बालशिक्षणाच्या कार्यपद्धती, बालसेविकांचे प्रशिक्षण कार्यक्रम, बालशिक्षणातील बालकाचा विविध अंगणी विचार इ. विषयांवर उपाय, विचारमंथनास योगदान करता येऊ शकेल आणि गुणवत्तापूर्वक बालशिक्षणाचा हातभार लावता येईल.

ह्या संशोधनावरील निष्कर्ष मांडतांना काही निकष वापरले ते म्हणजे – बालशिक्षणासंबंधित अध्ययन – अध्यापन प्रक्रिया, बालकाचा मानसशास्त्रीय अभ्यास, सामाजिक, भाषिक व शारीरिक विकास, पालक, शाळा, शिक्षक ह्यांची भूमिका व परिणाम. ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या संबधित शैक्षणिक संशोधनाचा अभ्यास ह्या विषयावरचा संशोधनाचा विचार केला गेला. ६ वर्षावरील बालकांच्या संशोधनाच्या विचार केला नाही.

तेव्हा बालशिक्षणातील सर्व मान्यवर व्यक्तींना बालशिक्षणात सुधारणा, बदल व गुणवत्ता (Quality) राखली जाण्यासाठी संशोधन काय सांगते ह्याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.